C|15

# राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत कंत्राटी तत्वावर योग प्रशिक्षक भरती जाहीरात सन २०२५-२६

## -: जाहीर प्रसिध्दीकरण :-

## कोल्हापूर महानगरपालिका

## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान

कोल्हापूर महानगरपालिका राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत शहरातील ११ प्राथमिक नागरी आरोग्य व २८ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर येथे नागरीकांना योग सेवा देणेकरिता मा.शासन अनुदानावर खालील नमूद केलेप्रमाणे योग शिक्षकांची भरती करणेकरीता सक्षम उमेदवाराकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र | पदनाम | आरोग्य संस्था | पद संख्या | वयोमर्यादा | पात्रता | प्रति योग सत्र रु. | सत्राची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | योग शिक्षक | प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र | ११ | वय वर्ष १८ ते ४५ | १.योग डिप्लोमा/डिग्री<br>२.योग प्रशिक्षक हा नामांकित योग संस्थेकडून प्रमाणित असावा. | २५०/- | प्रति महिना २ सत्रे. |
| २ | योग शिक्षक | नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर | २८ | | १.योग डिप्लोमा/डिग्री<br>२.योग प्रशिक्षक हा नामांकित योग संस्थेकडून प्रमाणित असावा. | ५००/- | प्रति महिना ५ सत्रे. |

<u>महत्वाच्या सुचना</u> :-

१. नियुक्ती करणेत येणारे योग शिक्षक यांनी उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे सत्रे आयोजित करावयाचे असून नमूद केल्याप्रमाणेच मानधन अदा करणेत येईल. सदर मानधन एकत्र असून योग सत्र घेणेसाठी आरोग्य केंद्रांच्या ठिकाणी जाणेकरीता कोणतेही प्रवास शुल्क दिले जाणार नाही.
२. एका योग शिक्षकास एकाच केंद्राच्या ठिकाणी योग सेवा देणेची मुभा आहे.
३. नियुक्ती ही करार तत्वावर असून त्याचा कोल्हापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेशी कसलाही संबंध नाही.
४. नियुक्त करणेत आलेल्या उमेदवारास महानगरपालिका सेवेत कोणत्याही प्रकारे हक्क सांगता येणार नाही तसेच कोणत्याही प्रकारे कायदेशीर दाद मागता येणार नाही.
५. नियुक्त करणेत आलेल्या उमेदवारास अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार रु.५००/- चे स्टँम्प पेपरवर लिहून नोटरी करुन द्यावा लागेल.
६. अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अटी पूर्ण करतात याबाबत प्रथम खात्री करून घ्यावी व त्यानंतरच अर्ज करावेत.
७. जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या कमी-जास्त/रद्द होण्याची शक्यता आहे याचे अधिकार मा.प्रशासकसो, कोमनपा यांना राहतील.
८. सदर पदांसाठी दर सोमवारी अर्ज स्वीकारणेत येतील. नमूद पदसंख्या प्रमाणे योग शिक्षक भरती होईपर्यत दर सोमवारी अर्ज सकाळी ११ ते १२ या वेळेत स्थायी समिती सभागृह, मुख्य इमारत कोमनपा येथे स्वीकारणेत येतील.

९. योग प्रशिक्षक नेमताना मनपा स्तरीय समिती मार्फत प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पाहून योग प्रशिक्षक नेमणेत येतील.
१०. सदर योग प्रशिक्षक यांची नेमणूक दि.२९/६/२०२५ अखेर राहील. यांच्या मागील कामाचे मूल्यांकन करुन सदर बार्बीस मा.शासनाकडून मुदतवाढ मिळाल्यास पुर्ननियुक्ती देणेत येईल.
११. अपूर्ण माहितीचे अथवा विहित केलेली अर्हता नसलेल्या उमेदवारांचे अर्ज कोणतेही कारण न सांगता रद्दबातल ठरविणेत येतील यासाठी उमेदवारास लेखी कळविणेत येणार नाही.
१२. अर्हताधारक उमेदवारांनी खालील विहीत करणेत आलेल्या नमुन्यात लेखी अर्ज करावेत.
१३. पात्र उमेदवारांनी मुलाखतीसाठी उमेदवाराने स्वखर्चाने निर्धारीत वेळेत उपस्थित रहाणेचे आहे.
१४. अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणलेस त्यास निवड प्रक्रियेतून बाद करणेत येईल.

**अर्ज करण्याची पध्दत :-**

१) उमेदवाराने जाहिरातीमध्ये दिलेल्या विहित नमुन्यातच अर्ज करावा.
२) अर्जासोबत पुढील आवश्यक कागदपत्रांची साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात. यामध्ये योग डिप्लोमा/डिग्री तसेच शसकीय व निमशाकीय अनुभव असलेस अनुभव प्रमाणपत्र, वयाचा पुरावा, ओळखपत्र, इ.
३) मुलाखत दिनांक व स्थळ, इ.बाबतची माहिती कोल्हापूर महानगरपालिकेच्या www.kolhapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्दी करणेत येईल.
४) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, पुर्वानुभव व इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात व मुलाखतीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्राच्या मुळ प्रतींसह उपस्थित रहाणेचे आहे.
५) पात्रता, अर्जाची स्विकृती किंवा तो नाकारणे, चुकीची माहिती दिल्याबद्दल शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

उपायुक्त-२
कोल्हापूर महानगरपालिका

D:\Suresh 2024-25\Prop\Yoga Teacher.docx

# अर्जाचा नमुना -

अर्जाचा नोंदणी क्रमांक :-

ओळखपत्र आकाराचे छायाचित्र

प्रति,
मा.आयुक्त तथा अध्यक्ष,
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर.

विषय :- --------------- या पदासाठी अर्ज.

| | |
|---|---|
| १) संपूर्ण नांव | : |
| २) पत्ता | : |
| ३) लिंग | : |
| ४) जन्म दिनांक | : / / |
| ५) जाहिरात दिनांकास वय<br>६) ई-मेल आयडी | : वर्षे - महिने - दिवस -<br>: मोबाईल नंबर:- |

| ७) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल) | विद्यापीठाचे / परिक्षा मंडळाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | घेतलेले विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| अ) | | | | |
| ब) | | | | |
| क) | | | | |
| ड) | | | | |

८) सदर पदाचा पुर्वानुभव आहे काय ? (असल्यास खालील रखान्यातं तपशील द्यावा) होय/नाही

| अ.क्र | कार्यालयाचे नांव व पुर्ण पत्ता | धारण केलेले पद | कार्यालय/संस्था शासकीय आहे काय | वेतनश्रेणी | सेवेचा कालावधी पासून - पर्यंत |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

- उमेदवाराने करावयाचे प्रतिज्ञापत्र -

मी असे प्रमाणित करतो/करते की, या अर्जात दिलेली माहिती खरी आहे, त्यापृष्ट्यर्थ मी मुलाखतीचेवेळी प्रमाणपत्राच्या मुळप्रती सादर करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल, तसेच या माहितीच्या आधारे होणारी शिफारस/नियुक्ती रद्द होईल याची मला जाणीव आहे. त्यासंबंधीचा नियुक्ती प्राधिका-याचा निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील आणि त्यासंबंधी माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

| | |
|---|---|
| ठिकाण :- ................................ | अर्जदाराची स्वाक्षरी :-<br>........................................................ |
| दिनांक :- ................................ | नांव:- ........................................................ |